http://www.sgbauonline.com/

B.Com. (Part—I) Accounting and Finance (Semester—I) Examination

MARATHI

(Compulsory)

वेळ : दोन तास] [एकूण गुण : 40

सूचना :— सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

1. लोकहितवादी यांनी कोणते विचार मांडले आहेत ? 8

किंवा

म. फुल्यांनी सांगितलेले शेती सुधारण्याचे उपाय आजच्या कालखंडात कसे लागू होतात ? 8

2. हरी नारायण आपटे यांना कोणता इहलोकिचा स्वर्ग अभिप्रेत आहे ? 8

किंवा

राजे सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री शिक्षण-विषयक विचार आनंदीबाई शिर्के यांनी कसे स्पष्ट केले आहेत ? 8

3. खालीलपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा (प्रत्येकी **4** गुण) : 8

(अ) लेकुखाड्या विठोबाचे जनाबाईंनी कसे वर्णन केले आहे ?

(आ) तुकारामाने दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन आपल्या अभंगातून कोणते मर्म सांगितले आहे ?

(इ) लक्ष्मीबाई टिळक यांनी कवितेतून कोणते विचार मांडलेलेले आहेत ?

(ई) बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेचा आशय लिहा.

4. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तरे द्या : 4

(1) प्रसारमाध्यमाच्या लेखनाची वैशिष्टे लिहा.

(2) लेखांचे लेखन कशा प्रकारे केले जाते ?

(ब) खालील उताऱ्याचे सारांश लेखन शंभर शब्दात लिहा : 4

समाजात वापरल्या जाणाऱ्या सर्वसाधारण भाषेच्या प्रवाहाशी समांतर वाहणारा, पण ज्ञान-विषयांच्या बाबतीत आवश्यक असणारा संज्ञा व संकल्पनांचा प्रवाह म्हणजे 'परिभाषा' होय. मूळ भावोशिवाय परिभाषा असू शकत नाही, हे उघड आहे. समाजाचा जसा ज्ञान-वैज्ञानिक विकास होत जातो, तसतसे विविध प्रकारच्या ज्ञान विषयांचे लेखन-वाचनही केले जाते. या ज्ञान-विज्ञान क्षेत्रातील भाषेचे विशिष्ट व नेमके, असे जे रूप असते, ते रूप म्हणजे परिभाषा असेही म्हणता येईल.

विशिष्ट विद्या शाखेत किंवा विज्ञान शाखेत विशिष्ट अर्थाने वापरले जाणारे विशिष्ट शब्द म्हणजे 'संज्ञा' होय. संज्ञांची निर्मिती सहसा व्यावहारिक भाषेतून होत नाही. तिचा उगमस्रोत हा ज्ञान-विज्ञान क्षेत्रातून होतो. उदा. 'ध्वनी' हा शब्द घेतला तर, संस्कृत साहित्यशास्त्रात ध्वनी व ध्वनिसिद्धांत यांना वेगळा अर्थ आहे आणि भौतिकशास्त्रात वेगळा अर्थ आहे आणि ते त्या-त्या ज्ञानशाखेत पुरेसे व्याख्यात झालेले असतात. त्यामुळे लेखन-वाचन हे सुटसुटीत आणि नेमके असे होते.

'संकल्पना' हा एक साधारपणे परस्पर संबंधित अशा गोष्टीचा व्यूह असतो. संकल्पनेचा जनक त्या व्यूहातील काही गोष्टी व्यक्त करतो. नंतरचे अभ्यासक त्या संकल्पनेतील अध्याहुत अर्थ शोधत राहतात. उदाहरणार्थ भरतमुनींची रसाची संकल्पना. ती अर्थसंपृक्त अशा प्रकारची संकल्पना असल्यामुळे रस म्हणजे काय ? येथपासून रसांची संख्या किती असावी. येथपर्यंत कित्येक शतके प्रथम संस्कृतात व अलीकडे मराठीत चर्चा होत राहिली. तीच गोष्ट स्वच्छंदतावादाची किंवा रोमॉटिसिझमची म्हणता येईल, इंग्लिश कवींचा स्वच्छंदतावाद व आमच्या आधुनिक कवींचा स्वच्छंदतावाद यात मूलत: फरक नसला तरी स्थलकालपरत्वे त्या संकल्पनेतील वेगवेगळे अर्थ आपण सांगू शकतो व इंग्रजी समीक्षकही सांगू शकतात.

संकल्पना ही तत्वज्ञानातील संज्ञा आहे. तिचे स्वरूप म्हणजे खरे तर अनेक अशा संबंधित गोष्टींचे सलग, एकात्म चित्र असे म्हणता येईल, संकल्पनेतील गर्भित, अध्याहुत गोष्टी तिच्या बीजात असतात. म्हणून एका दृष्टीने बीजभूत कल्पना म्हणजे संकल्पना होय.

प्रा. रा.ग. जाधव

http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

5. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा : 1×8=8

(1) लोकहितवादी यांचे पूर्ण नांव ..... आहे.

(अ) पांडूरंग सदाशिव साने (ब) नारायण हरी आपटे

(क) गोपाळ हरी देशमुख (ड) हरी नारायण आपटे

(2) शेती सुधारण्याचे उपाय हा लेख ..... यांचा आहे.

(अ) गोविंदराव जोतीबा फुले (ब) हरी नारायण आपटे

(क) जोतीबा गोविंदराव फुले (ड) बाबा पद्मनजी

(3) ज्ञानेश्वरांच्या विराणीतून कशाचे दर्शन घडते ?

(अ) मृदूतेचे (ब) शौर्याचे

(क) वेदनेचे (ड) आध्यात्मिकतेचे

(4) केशवसुताचे संपूर्ण नांव ..... आहे.

(अ) केशव कृष्णाजी दामले (ब) केशव प्रल्हाद अत्रे

(क) कृष्णाजी केशव दामले (ड) नारायण मुरलीधर गुप्ते

(5) इहलोकाचा स्वर्ग हा ललित लेख ..... यांचा आहे.

(अ) आनंदीबाई शिर्के (ब) ह. ना. आपटे

(क) ना.ह. आपटे (ड) लोकहितवादी

(6) ..... स्त्री जीवनाचे दुःख 'वेणु'या पाठातून व्यक्त झाले आहे.

(अ) वैधव्य प्राप्त झालेल्या (ब) अल्पायुष्यात वैधव्य प्राप्त झालेल्या

(क) दुःखी जीवन प्राप्त झालेल्या (ड) कुमारीका असलेल्या

(7) कोणत्या साधनांनी तंत्रज्ञानात क्रांती घडवून आणली ?

(अ) संगणक व उपग्रह (ब) वृत्तपत्रे

(क) दूरदर्शन (ड) नभोवाणी

(8) प्रसार माध्यमे केवळ माहिती देण्याचे व ..... करण्याचे काम करीत नाही.

(अ) उपयोजन (ब) देवाणघेवाण

(क) रंजन (ड) लोकमत तयार करणे

http://www.sgbauonline.com/